व्यवस्थापन परिषदेची दिनांक १३ डिसेंबर, २०१९ रोजी संपन्न झालेल्या सभेचे ठराव व त्यावरील कार्यवाहीचा अहवाल.

| बाब क्र. | बाब, ठराव आणि कार्यवाही | संबंधित विभाग |
|---|---|---|
| बाब क्र.१ | **दि. १३ सप्टेंबर, २०१९, १८ सप्टेंबर, २०१९ (१३ सप्टेंबर, २०१९ रोजीची स्थगीत सभा) व २३ ऑक्टोबर, २०१९ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव सादर.** | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | सदर बाब विषय पत्रिकेवरुन मागे घेण्यात आली. सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या पुढील बैठकित ठेवण्यात यावी. | |
| बाब क्र.२ | **दि. १ जून, २०१९, ४ जुलै, २०१९ व १४ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या ठरावावरिल कार्यवाही अहवाल.** | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | सदर बाब विषय पत्रिकेवरुन मागे घेण्यात आली. सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या पुढील बैठकित ठेवण्यात यावी. | |
| बाब क्र.३ | **मुंबई विद्यापीठाच्या कन्नडा या विभागातून एम.ए. पदवी परिक्षेत "कन्नडा विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास/विद्यार्थ्यीनीस श्री. एम. वी. कुकियन" यांच्या नावे सुवर्ण पदक देण्याकरीता रु. ५,००,०००/- देणगी स्विकारण्याबाबत.** | शिष्यवृत्ती विभाग |
| ठराव | मुंबई विद्यापीठाच्या कन्नडा या विभागातून एम.ए. पदवी परिक्षेत "कन्नडा विषयात प्रथम येणाऱ्या विद्यार्थ्यास/विद्यार्थ्यीनीस श्री. एम. वी. कुकियन" यांच्या नावे सुवर्ण पदक देण्याकरीता रु. ५,००,०००/- देणगी स्विकारण्याबाबत मान्यता प्रदान करण्यात आली; तथापि चर्चेच्या अनुषंगाने भविष्यामध्ये देणगी स्विकारण्याबाबत खालील बाबीचा विचार करण्यात यावा :-<br>१. ज्या व्यक्तीच्या नावाने देणगी देणार आहे त्यांची संपुर्ण माहिती जसे व्यवसाय, सामाजिक कामे, योगदान, त्या विषयाच्या क्षेत्रामध्ये कामगिरी ईत्यादी.<br>२. जी रक्कम दिली आहे त्या रक्कमेच्या व्याजावर की मुळ रक्कमेतून सुवर्ण पदक घेतले जाणार, सुवर्ण पदक किती ग्रॅमचे असणार अथवा सोन्याचा मुलामा असणार, ईत्यादी.<br>३. जर १० वर्ष सुवर्ण पदक देणार असू तर त्यावेळी उरलेले रक्कमेचे काय करणार याचा विचार करून याबाबत प्र-कुलगुरू व डॉ. रश्मी ओझा यांच्या गठीत केलेल्या समितीने सुधारित मार्गदर्शक तत्वे तयार करावित. | |
| शिष्यवृत्ती विभाग यांनी केलेली कार्यवाही | ठरावानुसार देणगीदार "श्री.एम.बी. कुकियन" यांनी रू.५,००,०००/- (रूपये पाच लाख फक्त) चा धनादेश क. ३१०७६१ दि. ४/१/२०२० शिष्यवृत्ती विभागात जमा केला तो धनादेश पत्र क. SCh/4161 of 2020 dt. 8/01/2020 वित्त व लेखा विभागास पुढील कार्यवाहीसाठी जमा करण्यात आला, असे शिष्यवृत्ती विभागाने पत्र क. Sch./4286 of 2020 दिनांक २२ जानेवारी, २०२० अन्वये कळविले आहे. (प्रत संलग्न) | |
| बाब क्र.४ | **श्रीमती विजया एम. देशमुख (सीसीएफ), श्री. संतोष आर. सावंत (आयडॉल), श्री. अजित बी. पाटील (अर्थशास्त्र विभाग) आणि श्री. विनोद के. ठाकरकर (आयडॉल) यांनी डाटा एन्ट्री ऑपरेटर या पदावर १२ वर्षे पुर्ण झाल्याने सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना अंतर्गत सिस्टिम ऑपरेशन ऑफिसर या पदाचे वेतनलाभ मिळण्याकरीता.** | आस्थापना विभाग १ व ३ |

| | | |
|---|---|---|
| ठराव | श्रीमती विजया एम. देशमुख (सीसीएफ), श्री. संतोष आर. सावंत (आयडॉल), श्री. अजित बी. पाटील (अर्थशास्त्र विभाग) आणि श्री. विनोद के. ठाकरकर (आयडॉल) यांनी डाटा एन्ट्री ऑपरेटर या पदावर १२ वर्षे पुर्ण झाल्याने सुधारित सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना अंतर्गत सिस्टिम ऑपरेशन ऑफिसर या पदाचे वेतनलाभाबाबत खालील मुद्दे उपस्थित करण्यात आले.<br>१. वर्ग-क मधून थेट वर्ग-अ मध्ये पदोन्नती देता येते का?<br>२. सदर कर्मचा-यांकडे त्या पदाची शैक्षणिक अर्हता आहे का?<br>३. वर्ग अ मधील पदे भरतीप्रक्रियेद्वारे भरण्यात आली आहेत का?<br>४. या अगोदर किती कर्मचा-यांना वर्ग क मधून वर्ग अ मध्ये थेट पदोन्नती /अपग्रेटशन/आश्वासित प्रगती योजना अंतर्गत पदोन्नती देण्यात आली.<br>५. डाटा एन्ट्री ऑपरेटर/ कम्युटर ऑपरेटर यांना पदोन्नती चॅनेल काय हे ठरविणे गरजेचे आहे.<br>६. विना अनुदानित पदाच्या मनुष्यबळाच्या कार्याचे परिक्षण होणे गरजेचे आहे.<br>७. आश्वासित प्रगती योजना सध्या कार्यन्वीत आहे का?<br>८. विद्यापीठ फंडावर निर्गमीत केलेल्या पदावर आश्वासित प्रगती योजने अंतर्गत पदांचा वेतनलाभ देण्याकरिता विद्यापीठाचे धोरण निश्चित करणे, याबाबत मार्गदर्शक तत्वे बनविण्याबाबत समिती गठीत करण्यात यावी.<br>सदर समिती गठीत करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात आले.<br><br>**मानव संसाधन धोरण समिती:**<br>१. Dr. Rajan Welukar, Ex-Vice Chancellor.<br>२. Shri Shivdas, Retd. Govt. Officer Higher and Tech. Education<br>३. Dr. Rajendra Kankaria, Ex-Registrar, Shivaji University,<br>४. Shri. Ashok Phalnikar, Retd. Finance & Accounts Officer.<br>५. Prof. B.N. Jagtap, (I.I.T) Management Council Member.<br>६. Shri. Deepak Jadige, ICT DST/Ex.<br>७. Deputy Registrar-Estab 1/3- (Secretary). | |
| आस्थापना १ व ३ विभागाने केलेली कार्यवाही | सदर बाबत झालेल्या ठरावानुसार मानव संसाधन धोरण समिती गठीत करण्यात आली असून समितीच्या सदस्यांना बैठकीचा दिनांक व वेळ ठरविण्याबाबत पत्र क्र. इएसटी/आयसीडी/२०१९-२०/२३६९ दि. २४ डिसेंबर, २०१९ अन्वये कळविण्यात आलेले आहे, असे आस्थापना १ व ३ या विभागाने पत्र क्र. इएसटी/आयसीडी/२०१९-२०/२४१३ दिनांक १ जानेवारी, २०२० अन्वये कळविले आहे. (प्रत संलग्न) | |
| बाब क्र.५ | **श्री. एस. टी. मोरे व इतर कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीच्या प्रकरणासंदर्भात गठीत केलेल्या समितीचा प्राप्त अहवाल विचारार्थ सादर.** | आस्थापना विभाग १ व ३ |
| ठराव | श्री. एस. टी. मोरे व इतर कर्मचाऱ्यांच्या पदोन्नतीच्या प्रकरणासंदर्भात गठीत केलेल्या समितीच्या अहवालावर समितीच्या अध्यक्षांची सही नसल्याने याबाबत त्यांच्या विचारांची/मतांची अहवालात नोंद घ्यावी तसेच श्री. एस. टी. मोरे यांना पदोन्नती दिल्याने विद्यापीठावर किती | |

| | | |
|---|---|---|
| | आर्थिक भार येणार या माहितीसह पुन:श्च ही बाब व्यवस्थापन परिषदेमध्ये ठेवण्यात यावी. | |
| आस्थापना १ व ३ विभागाने केलेली कार्यवाही | सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या दि. ०७ फेब्रुवारी, २०२० च्या बैठकीत बाब क्र. ८ अन्वये ठेवण्यात आली. | |
| बाब क्र.६ | **शासन निर्णय क्र. एनजीसी २०१७/(२०८/१७) मशि-४ दि.१३ सप्टेंबर, २०१७ व विद्यापीठ सुधारित जाहिरात दि. २१ सप्टेंबर, २०१९ नुसार डी. एस. पी. मंडळाचे के. व्ही. पेंढारकर कॉलेज ऑफ आर्टस्, सायन्स ॲन्ड कॉमर्स, डोंबिवली (पू) ठाणे-४२१२०३ या महाविद्यालयाने (१) बी. एम. एम. (२)एम. ए. (इंग्रजी) (३) एम. ए. (इकॉनॉमिक्स) हे अभ्यासक्रम आणि बी कॉम (अकांउंटिंग ॲन्ड फायनान्स) अतिरिक्त तुकडी सुरु करण्यासाठीचे प्रस्ताव शासनाकडे सादर करण्याबाबत.** | सलंग्नता/मान्यता विभाग |
| ठराव | या विषयावर चर्चेच्या अनुषंगाने खालील ठराव करण्यात आला. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार के. व्ही. पेंढारकर महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष २०१९-२० चा प्रस्ताव शासनास पाठविण्याची शिफारस करण्यात आली तव्दतच महाविद्यालयाच्या विरोधात तक्रारी असल्यामुळे सदर तक्रारींची शहनिशा करण्यास्तव सत्य शोधक समिती गठित करण्यात यावी. महाविद्यालयाकडे सलंग्नता शुल्क व इतर शुल्क प्रलंबित आहे का ते तपासून त्याबाबतचा तपशिल व सत्य शोधक समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेपुढे सादर करण्यात यावा.सत्य शोधन समिती गठित करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात आले.<br><br>**समिती:-**<br>१. प्राचार्य रविंद्र देशमुख - अध्यक्ष.<br>२. श्री. महादेव जगताप - अधिसभा सदस्य.<br>३. प्रा. चंद्रशेखर मराठे - सदस्य. | |
| सलंग्नता/मान्यता विभाग यांनी केलेली कार्यवाही | १. के. व्ही. पेंढारकर महाविद्यालयाचे शैक्षणिक वर्ष २०१९-२० चा प्रस्ताव शासनास पाठविला आहे. (प्रत संलग्न)<br>२. सत्यशोधक समिती गठीत करण्यात आली आहे.(प्रत संलग्न), असे संलग्नता विभागाने पत्र क्र. संलग्नता/आयसीडी/२०१९-२०/२०३९ दिनांक ६ फेब्रुवारी, २०२० अन्वये कळविले आहे. (प्रत संलग्न) | |
| बाब क्र.७ | **श्री. अशोक डांगे, सेवानिवृत्त सहायक कुलसचिव यांना सेवानिवृत्ती नंतरचे लाभ कर्मचारी निवृत्ती वेतन व निवृत्ती वेतन लाभ फंडातून देण्याबाबतची बाब.** | आस्थापना विभाग २ व ४ |
| ठराव | श्री. अशोक डांगे यांच्या प्रकरणात गठीत केलेल्या समितीचे खालील प्रमाणे पुर्नगठण करण्यात आले:-<br>१. ॲड. वसंत गोखले,<br>२. डॉ. सुनिल भिरूड,<br>३. डॉ. विठ्ठल रोकडे<br>४. कुलसचिव (सदस्य सचिव)<br>सदर समितीने तातडीने अहवाल तयार करावा व अहवालासह बाब व्यवस्थापन परिषदेमध्ये ठेवण्यात यावी. | |

| | | |
|---|---|---|
| आस्थापना २ व ४ विभागाने केलेली कार्यवाही | आस्थापना विभाग २/४ यांनी पत्र क्र.इएसटी/आयसीडी/२०१९-२० /२४७८ दि. ६ जानेवारी, २०२० नुसार केलल्या कार्यवाहीचा अहवाल सोबत जोडला आहे. (प्रत संलग्न), असे आस्थापना २ व ४ या विभागाने पत्र क्र. इएसटी/आयसीडी/२०१९-२०/२५४२ दिनांक १४ जानेवारी, २०२० अन्वये कळविले आहे. (प्रत संलग्न) | |
| बाब क्र.८ | **वित्त व लेखा समितीच्या दि.१६ नोव्हेंबर, १९ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त.** | वित्त व लेखा विभाग |
| ठराव | वित्त व लेखा समितीच्या दि. १६ नोव्हेंबर, २०१९ रोजी झालेल्या सभेचे इतिवृत्त मान्य करण्यात आले. बाब क्र. ९ मध्ये रत्नागिरी मधील कर्मचाऱ्यांना देण्यात येणा-या घरभाडे भत्याबाबत CAG चे आलेले शेरे  वित्त व लेखा अधिकारी यांनी आवश्यक कार्यवाही करून त्याची पूर्तता करावी. यापुढे ज्या कर्मचाऱ्यांच्या बदल्या रत्नागिरी उपपरिसरात होतील त्या संदर्भात घरभाडे भत्त्याबाबत कर्तव्यस्थळी देय असलेला घरभाडे भत्ताच अनुदेय राहील, अशा आशयाचे हमीपत्र संबंधित कर्मचाऱ्यांच्याकडून घ्यावे. | |
| वित्त व लेखा विभागाने केलेली कार्यवाही | वित्त विभागाने पत्र क्र. वि.व.ले./वेतन/२०१९-२०/०४, दिनांक ७ मार्च, २०२० नुसार रत्नागिरी उपकेंद्रात पाठविण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांना मुंबई शहराप्रमाणे घरभाडे भत्ता, शहर पुरक भत्ता व वाहतुक भत्ता सर्वसाधारण निधीतून (General Fund) देण्याची कार्यवाही माहे एप्रिल २०२०, च्या वेतनापासून करण्यात येईल, असे कळविले. (प्रत संलग्न)<br>तसेच वित्त व लेखा विभागाचे पत्र क्र. FAO/ICD/2020-21/184 to 190 दि. ३ नोव्हेंबर, २०२० नुसार इतर बाबींचे कार्यवाही अहवाल या विभागास प्राप्त झाले आहे. | |
| बाब क्र.९ | **विद्यापीठातील कर्मचाऱ्यांच्या तांत्रिक संवर्गातील हंगामी नियुक्ती करतेवेळी देण्यात आलेला एक दिवसाचा तांत्रिक खंड रद्द करुन सदर पदांवर कायमस्वरुपी नियुक्ती करण्याबाबतची मागणी.** | आस्थापना विभाग १ व ३ |
| ठराव | विद्यापीठ फंडावरील पदांच्या कार्याचे अंकेक्षण करण्यात यावे, तसेच विद्यापीठ फंडावर निर्माण होणा-या पदाकरिता (अधिकारी/ कर्मचारी) यांचे सेवाप्रवेश, अर्हता, क्षेत्रिय अनुभव, पदावधी, कर्तव्ये, आचारसंहीता, सेवा शर्ती, सेवानिवृत्ती लाभ, सेवा समाप्त करण्याची रीत याकरीता नियम बनविण्याकरीता मानव संसाधन धोरण समिती गठीत करण्यात यावी. सदर समितीने याबाबत राज्य शासनाच्या धोरणाच्या अधिन राहून मागदर्शक तत्वे/नियम तयार करावे. समिती गठीत करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात आले.<br>**मानव संसाधन धोरण समिती:—**<br>1. Dr. Rajan Welukar, Ex-Vice Chancellor.<br>2. Shri Shivdas, Retd. Govt. Officer Higher Education Tech. Education.<br>3. Dr. Rajendra Kankaria, Ex-Registrar, Shivaji University.<br>4. Shri. Ashok Phalnikar, Retd. Finance & Accounts Officer.<br>5. Prof. B.N. Jagtap, (I.I.T) Management Council Member.<br>6. Shri. Deepak Jadige, ICT DST/Ex.<br>7. Deputy Registrar-Estab 1/3- Secretary. | |

| | | |
|---|---|---|
| आस्थापना १ व ३ विभागाने केलेली कार्यवाही | सदर बाबत झालेल्या ठरावानुसार मानव संसाधन धोरण समिती गठीत करण्यात आली असून समितीच्या सदस्यांना बैठकीचा दिनांक व वेळ ठरविण्याबाबत पत्र क्र. इएसटी/आयसीडी/२०१९-२०/२३६९ दि. २४ डिसेंबर, २०१९ अन्वये कळविण्यात आलेले आहे, असे आस्थापना १ व ३ या विभागाने पत्र क्र. इएसटी/आयसीडी/२०१९-२०/२४१३ दिनांक १ जानेवारी, २०२० अन्वये कळविले आहे. (प्रत संलग्न) | |
| बाब क्र. १० | **Implementing MYBYK (Bicycle Share) Scheme in Kalina Campus, University of Mumbai.** | **CDU** |
| **ठराव** | पर्यावरण संतुलनाचे अनुषंगाने Go Green ही अत्यंत महत्वाची संकल्पना राबविणे विद्यापीठाचे धोरण असल्याने MYBYK (Bicycle Share) संकल्पना मुंबई विद्यापीठाच्या कलिना परिसरात प्रथम प्रायोगीक तत्चावर सहा महिन्याकरिता राबविण्याची मान्यता प्रदान करण्यात आली. | |
| <u>विद्यापीठ क्षेत्र विभागाने केलेली कार्यवाही</u> | पर्यावरण संतुलनाचे अनुषंगाने Go Green ही अत्यंत महत्वाची संकल्पना राबवणे या विद्यापीठाच्या धोरणाच्या अनुषंगाने मुंबई विद्यापीठ आणि Greenpedia Bike Share Private Limited (MYBYK-Bicycle Share) यांच्याशी संयुक्त करारनामा झाला आहे, याबाबत लवकरच MYBYK ही संकल्पना सुरू होईल, असे विद्यापीठ क्षेत्र विकास विभागाने पत्र क्र. Engg/ICD/2019-20/1492 दिनांक ११ मार्च, २०२० अन्वये कळविले आहे. (प्रत संलग्न) | |
| बाब क्र.११ | **युजीसी योजनेप्रमाणे पात्र वरिष्ठ उपकुलसचिवांना दर्जोन्नत (Upgrade) करून शासनाकडुन या पदांना मंजुरी मिळेपर्यंत सहकुलसचिव/सहसंचालक, परिक्षा व मुल्यमापन मंडळ, सहसंचालक, विद्यापीठ परिसर/सह वित्त व लेखा अधिकारी ही पदे विद्यापीठ फंडातून निर्माण करून त्याचा कार्यभार तात्काळ पात्र वरिष्ठ उपकुलसचिवांना सोपविणेबाबत.** | आस्थापना विभाग १ व ३ |
| ठराव | अलिकडे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (National Education Policy) आल्याने त्यांच्या विचार होणे गरजेचे आहे. अशी पदे निर्माण केली व त्यास शासनाने मान्यता व अनुदान दिले नाही तर शासन मान्य पदावरील अधिका-यांना या पदांवर दर्जोन्नत केले तर सेवानिवृत्ती वेतन लाभाचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे या बाबींचा गांभिर्याने विचार करणे गरजेचे आहे. मानव संसाधन धोरण करण्याकरिता प्रस्तावित समिती समोर हया विषयाबाबत दिशानिदेश तयार करण्याकरिता सादर करण्यात याव्यात. | |
| आस्थापना १ व ३ विभागाने केलेली कार्यवाही | सदर बाबत झालेल्या ठरावानुसार मानव संसाधन धोरण समिती गठीत करण्यात आली असून समितीच्या सदस्यांना बैठकीचा दिनांक व वेळ ठरविण्याबाबत पत्र क्र.इएसटी/आयसीडी/२०१९-२०/२३६९ दि. २४ डिसेंबर, २०१९ अन्वये कळविण्यात आलेले आहे, असे आस्थापना १ व ३ या विभागाने पत्र क्र. इएसटी/आयसीडी/२०१९-२०/२४१३ दिनांक १ जानेवारी, २०२० अन्वये कळविले आहे. (प्रत संलग्न) | |
| बाब क्र.१२ | **No Objection Certificate for Merger of Chetana's Institute of Management & Research (CIMR) under the "Chetana Trust" to Chetana's Rampradsad Khandewal Institute of Management & Research** | संलग्नता विभाग |

| | | |
|---|---|---|
| **ठराव** | विषयाच्या अनुषंगाने संस्थेअंतर्गत दोन महाविद्यालयांचे विलिनीकरण्याची बाब असल्याने संबधीत महाविद्यालयतील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचा-यांचा विषय व इतर आवश्यक सुविधांची पुर्तता होते की कसे हयाची पाहणी करण्याकरिता स्थानिक चौकशी समिती (LIC) तातडीने गठीत करावी व समितीच्या अहवालानुसार नियमाप्रमाणे कार्यवाही करावी. सदर समिती गठीत करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात आले.<br>**समिती:—**<br>१. Pro. Kavita Laghate, Associate Dean-Commerce & Mgmt.<br>२. Dr. Rajeshwari G. Gundappa, Hinduja College.<br>३. Dr. Vijeta Shetty, Vivek College. | |
| **संलग्नता मान्यता विभागाने केलेली कार्यवाही** | संलग्नता मान्यता विभाग यांनी पत्र क्र.संलग्नता/आयसीडी/२०१९-२० /१९७८ दि. २२ जानेवारी, २०२० नुसार केलल्या कार्यवाहीचा अहवाल सोबत जोडला आहे. (प्रत संलग्न), असे संलग्नता विभागाने पत्र क्र. संलग्नता/आयसीडी/२०१९-२०/१९७८ .दिनांक २२ जानेवारी, २०२० अन्वये कळविले आहे. (प्रत संलग्न) | |
| **बाब क्र. १३** | **Approval for the acceptance to Cheque of Rs.15,00,000/-received from Shri S.R. Halbe, Hon. Secretary, Shri Brihad Bhartiya Samaj.** | **वित्त व लेखा विभाग** |
| ठराव | श्री ब्रिहद भारतीय समाज 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या हस्तलिखिताचे जतन करण्याकरिता' ३० लाख रुपये देण्यास तयार आहे त्यापैकी त्यांनी दिलेला रु. १५,००,०००/- (पंधरा लाख रुपये) चा धनादेश स्विकारण्यास मान्यता प्रदान करण्यात आली.<br>चर्चेच्या अनुषंगाने मा. सदस्यांनी महान नेत्यांच्या जसे डॉ. बाबासाहेब आंबेडकर, मोरारजी देसाई, डॉ. होमीभाभा ई. मुंबई विद्यापीठाच्या माजी विद्यार्थ्यांच्या पदव्यांचे प्रदर्शन व्हावे; डॉ. बाबासाहेब आंबेडकरानी लिहलेला ग्रंथ सिध्दार्थ महाविद्यालयास दिला त्याचे देखिल जतन करणे ही विद्यापीठाची जबाबदारी आहे. तव्दतच ईतर ग्रंथालयात उपलब्ध असलेली महत्त्वाची हस्तलिखीते (mauscripts) देखील जतन करावी, असे विचार मांडले त्यावर मा. कुलगुरूंनी खालील प्रमाणे निर्णय दिला :-<br>१. जुने ग्रंथ किंवा पोथ्यांची हस्तलिखिते असतात. त्याच्यासाठी विशिष्ट प्रकारची संगणकप्रणाली असते. त्याच्यावर ते स्कॅन केल जाते. डिजीटल फॉर्म मध्ये ती स्फॉटकॉपी जतन केल्या जातील.<br>२. जुनी पुस्तके आणि ग्रंथावर वेगळया प्रकारची प्रक्रिया केली जाते, ग्रंथाचे आयुष्य अधिक वाढावे म्हणुन तज्ज्ञाकरवी कार्यवाही करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. | |
| **वित्त व लेखा विभागाने केलेली कार्यवाही** | सदर बाब ग्रंथपाल यांच्या अखत्यारीत येत असल्यामुळे ठराव तसेच संबंधित कागदपत्रे ग्रंथपाल जवाहरलाल नेहरू ग्रंथालय यांच्याकडे माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी पाठविण्यात आली आहे, असे वित्त व लेखा विभागाने पत्र क्र. संलग्नता/आयसीडी/२०१९-२०/२०३९ दिनांक ६ फेब्रुवारी, २०२० अन्वये कळविले आहे. (प्रत संलग्न) | |
| **जवाहरलाल नेहरू ग्रंथालय विभागाने केलेली कार्यवाही** | या ठरावाची योग्य ती कार्यवाही करण्याचे काम सुरू आहे, असे जवाहरलाल नेहरू ग्रंथालय या विभागाने पत्र क्र. JNL/302/2021 दिनांक ९ एप्रिल, २०२१ अन्वये कळविले आहे. (प्रत संलग्न) | |

| | | |
|---|---|---|
| **बाब क्र.१४** | **मुंबई विद्यापीठ आणि एमकेसीएल यांच्यामध्ये ऑक्टोबर, २०१६ मध्ये झालेल्या कराराची मुदत वाढवून ऑक्टोबर, २०१९ पासून आवश्यक त्या सुधारणांसहित नविन करार करणेबाबत.** | पात्रता व स्थलांतर विभाग |
| **ठराव** | मुंबई विद्यापीठ आणि एमकेसीएल यांच्यामध्ये ऑक्टोबर, २०१६ मध्ये झालेल्या कराराची मुदत वाढवून ऑक्टोबर, २०१९ पासून मुदतवाढ देण्यास मान्यता देण्यात आली. याबाबत नविन सुधारणेसह कराराचा मसुदा विधी सल्लागार व सामंजस्य करारासाठी गठीत केलेल्या समिती मार्फत तपासुन व्यवस्थापन परिषदेत सादर करण्यात यावा. | |
| **पात्रता व स्थलांतर विभागाने केलेली कार्यवाही** | नावनोंदणी पात्रता व स्थलांतर विभागाचे पत्र क्र. Elg./690 of 2020, दि. ३० डिसेंबर, २०२० नुसार सदर ठरावाची प्रत तसेच सदर करारामध्ये आवश्यक त्या सुधारणा करून देण्याबाबतचे पत्र पुढील कार्यवाहीसाठी सहायक कुलसचिव, विद्याविषयक नियोजन आणि विकास विभाग यांच्याकडे विभागाच्या पत्र क्र. Elg./1103 of 2020, दिनांक २८ जानेवारी, २०२० द्वारे पाठविण्यात आले आहे. (प्रत संलग्न), असे पात्रता व स्थलांतर विभागाने पत्र क्र. संलग्नता/आयसीडी/२०१९-२०/१९७८ दिनांक २२ जानेवारी, २०२० अन्वये कळविले आहे. (प्रत संलग्न) | |
| **बाब क्र.१५** | **शासन निर्णय क्र. शनिवा-२५१७/प्र.क्र.३३/२३-अ दि. ३०/०८/२०१८ अन्वये शासकीय निवासस्थानात अनुज्ञेय कालावधीनंतर अधिक वास्तव करण्याबद्दल दंडनीय दराने प्रती चौरस फुट रू.१५० अनुज्ञप्ती शुल्क आकारण्याबाबतची बाब.** | सामान्य प्रशासन विभाग, फोर्ट |
| **ठराव** | शासन निर्णय क्र. शनिवा-२५१७/प्र.क्र.३३/२३-अ दि. ३०/०८/२०१८ अन्वये शासकीय निवासस्थानात अनुज्ञेय कालावधीनंतर अधिक वास्तव करण्याबद्दल दंडनीय दराने प्रती चौरस फुट रू.१५० अनुज्ञप्ती शुल्क आकारण्यात मान्यता देण्यात आली. शासकीय निवासस्थानात अनुज्ञेय कालावधीनंतर अधिक वास्तव करणा-यांना बेकायदेशिरपणे राहण्याबाबत पत्र पाठविण्यात यावे व त्यामधे ते निवृत्तीनंतरही विद्यापीठाच्या निवासामधे राहत असल्याने बेकायदेशिर (अनधिकृत) रहिवाशी म्हणून त्यांचा स्पष्ट उल्लेख असावा. पत्राचा मसुदा विधी सल्लागाराकडुन मान्य करून घ्यावा. | |
| **सामान्य प्रशासन विभागाने केलेली कार्यवाही** | दि. १३/१२/२०१९ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेमध्ये पारित झालेला ठराव लागू करण्यासंबंधात कालावधी स्पष्ट करण्यात आला नसल्यामुळे ठरावाची अंमलबजावणी करण्यास अडचण निर्माण झाली, यास्तव सदरहु ठरावामध्ये योग्य ती दुरुस्ती करण्याची कार्यवाही पूर्ण करुन त्याप्रमाणे सामान्य प्रशासन विभागास अवगत करण्यात यावे. असे क्र. GAD/ICM/2019-20/1214 दिनांक: ०१/०२/२०२० च्या पत्रान्वये (पताका-१) सहायक कुलसचिव, कार्यकारी प्राधिकरणे विभाग, यांना कळविण्यात आले होते.<br>सदरहु पत्रास अनुसरुन संबंधित विभागाने सदर बाबत आपल्या स्तरावर प्रशासकीय आदेश घेण्यात यावेत अथवा ठराव दुरुस्तीसाठीची बाब व्यवस्थापन परिषदेपुढे ठेवण्यात यावी असे क्र. का.प्रा.वि. आयसीडी/२०१९-२०/५५३ दि.३/०२/२०२० च्या पत्राने (पताका-२) कळविले आहे. सदरहु पत्रास अनुसरुन सदर बाब व्यवस्थापन परिषदेच्या दिनांक २७ नोव्हेंबर, २०२० रोजीच्या बैठकीत पुन:श्च सादर करण्यात आली आहे. | |

| | | |
|---|---|---|
| बाब क्र.१६ | **विविध शैक्षणिक संस्था/विद्यापीठ यांसकडून प्राप्त झालेल्या विविध शैक्षणिक कार्यक्रमाकरिता प्राप्त झालेल्या सामंजस्य कराराचा मसुदाबाबतचा मान्यतेस्तव** | विद्याविषयक नियोजन आणि विकास विभाग |
| ठराव | विविध शैक्षणिक संस्था/विद्यापीठाकडून प्राप्त झालेल्या खालिल सामंजस्य नमुद करारांबाबत विस्तृत चर्चा झाली :—<br>1. Memorandum of Understanding between Department of Sanskrit, University of Mumbai AND Drishti Stree Adhayan Prabodhan Kendra, Kaushik Asharam,<br>2. Memorandum of Understanding between the University of Mumbai AND CASI<br>3. Memorandum of Understanding between the Department of English, University of Mumbai AND the University of Oradea, Romania<br>4. Memorandum of Understanding between Department of Computer Science, University of Mumbai AND M/s Greyatom Edutech Private Limited.<br>5. Memorandum of Understanding between Department of Communication and Journalism, University of Mumbai AND Upgrad Education Private Limited Company<br>यावर सहपत्राचे पृष्ठ क्र. ४ वरील मुद्दा क्र. ३४ व ३५ वगळावा. अनुक्रमांक ३ वरील सामंजस्य करारास मान्यता देण्यात आली. उर्वरित विविध शैक्षणिक कार्यक्रमाकरिता प्राप्त झालेल्या सामंजस्य कराराचा मसुदा सामंजस्य करारासाठी गठीत केलेल्या समितीकडुन त्यांच्या सुचनेनुसार सुधारणांचा अंर्तभाव झाल्याचे तपासुन घ्यावे व अधिष्ठाता मंडळामार्फत व्यवस्थापन परिषदेत सादर करण्यात यावा. | |
| विद्याविषयक नियोजन आणि विकास विभागाने केलेली कार्यवाही | व्यवस्थापन परिषदेच्या दि. १३ डिसेंबर, २०१९ रोजीच्या बैठकीत बाब क्र. १६ नुसार पारित झालेल्या सामंजस्य कराराच्या मसुदाबाबतचा प्रस्तावावरील अनुक्रमांक ०३ मान्य करण्यात आला उर्वरित विविध शैक्षणिक कार्यक्रमाकरिता प्राप्त झालेल्या सामंजस्य कराराच्या मसुदा सामंजस्य करारासाठी गठीत केलेल्या समितीकडून त्यांच्या सुचनेनुसार सुधारणांचा अंतर्भाव झाल्याचे तपासुन घ्यावे व अधिष्ठाता मंडळामार्फत व्यवस्थापन परिषदेत सादर करण्यात यावा असा ठराव मंजुर करण्यात आला.<br>त्या अनुषंगाने अनुक्रमांक ०३ च्या कराराचा प्रस्ताव शासनास दि. ०५ मार्च, २०२० रोजी मान्यतेकरिता पाठविण्यात आलेले आहेत व विविध शैक्षणिक कार्यक्रमाकरिता प्राप्त झालेल्या सामंजस्य कराराच्या मसुदा सामंजस्य करार पुर्नविचारार्थ गठीत केलेल्या समितीपुढे विचाराधीन आहेत, असे विद्याविषयक नियोजन आणि विकास विभागाने पत्र क्र. संलग्नता/आयसीडी/२०१९-२०/१९७८ दिनांक २२ जानेवारी, २०२० अन्वये कळविले आहे. (प्रत संलग्न) | |
| बाब क्र.१७ | **दिनांक २३ ऑक्टोंबर, २०१९ रोजीच्या व्यवस्थान परिषद सभेतील बाब क्र. १८ व पारित झालेला ठरावा सोबत जोडलेल्या विद्याशाखानिहाय सुधारित यादी मान्यतेबाबत.** | यु.जी. व पी.जी. विभाग |
| ठराव | व्यवस्थापन परिषदेच्या दि.२३ ऑक्टोंबर, २०१९ रोजीच्या सभेतील 'परिशिष्ठ ब'मधील विद्याशाखानिहाय अभ्यासक्रम यादीत कला विद्या शाखेच्या अंतर्गत अभ्यासक्रमाच्या यादित त्याच प्रमाणे गरवारे संस्था अभ्यासक्रमाच्या यादित पुनरावृत्ती झाल्यामुळे सदर अभ्यासक्रमांच्या | |

| | | |
|---|---|---|
| | पात्रतेच्या निकषानुसार सदर अभ्यासक्रमांची संबंधित विद्याशाखेत विभागाणी केल्याने मानव विज्ञान शाखा (कला), विज्ञान व तंत्रज्ञान (विज्ञान) आणि वाणिज्य व व्यवस्थापन याच्या अभ्यासक्रमाच्या संज्ञा (Nomencalture) यादित बदल झाल्यामुळे सुधारित विद्याशाखानिहाय अभ्यासक्रमाच्या (Nomencalture) संज्ञाच्या यादिस 'परिशिष्ट अ' नुसार मान्यता देण्यात आली व मा. कुलपतींकडे मंजुरीसाठी पाठविण्याची शिफारस करण्यात आली. बाब पदविंच्या शिर्षकांची असल्याने त्याअनुषंगाने स्पेलिंगस् काटेकोरपणे तपासावे व ते अचुक असल्याची खात्री करून घ्यावी. | |
| **यु.जी. व पी.जी. विभागाने केलेली कार्यवाही** | व्यवस्थापन परिषदेच्या दि. १३/१२/२०१९ रोजीच्या बैठकीमधील बाब क्र. १७ वर पारित झालेला ठराव प्राप्त होताच Humanities, Science & Technology and Commerce & Management विद्याशाखेअंतर्गत UG & PG अभ्यासक्रमाबाबतचे सुधारीत अध्यादेश अनुक्रमे<br>(१) Letter No. UG/ICD/588/2020, dated 9th January, 2020,<br>(२) Letter No. UG/ICD/595/2020, dated 9th January, 2020 &<br>(३) Letter No. UG/ICD/599/2020, dated 9th January, 2020, To The Secretary to the Chancellor of the University of Mumbai यांच्या कार्यालयात पाठविण्यात आलेले आहेत, असे यु.जी व पी.जी विभागाने पत्र क्र. संलग्नता/आयसीडी/२०१९-२०/१९७८ दिनांक २२ जानेवारी, २०२० अन्वये कळविले आहे. (प्रत संलग्न) | |
| | **चर्चेच्या अनुषगांने आलेले विषय :—** | |
| | आंतर विद्यापीठ राज्य स्तरीय युवा महोत्सव (इंद्रधनुष्य) जो गोंडवाना विद्यापीठामध्ये संपन्न झाला त्यामध्ये सलग चौथ्यांदा मुंबई विद्यापीठाला प्रथम स्थान प्राप्त झाल्याबद्दल तसेच जे विद्यार्थी आपल्या मुंबई विद्यापीठाचे नावलौकीक उंचावतात तव्दतच सांस्कृतिक क्रिडा व इतर क्षेत्रामध्ये नेत्रदिपक कामगिरी केल्याबद्दल संबधित विद्यार्थ्यांचा त्यांच्या पालकांसमवेत विद्यापीठाच्या ऐतिहासिक दिक्षांत सभागृहातच सत्कार व्हावा असे मत मा. सदस्य श्री. प्रदिप सांवत यांनी व्यक्त केले. | |



डॉ. बळीराम गायकवाड
कुलसचिव (प्र.)
(मुंबई विद्यापीठ)

मुंबई – ४०० ०३२
२५ मे, २०२१